# T14/AGR217/EE/20160305

**वेळ : 3 तास** **गुण : 80**

**सूचना :**

1) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.
2) प्रत्येक उप–प्रश्न पाच गुणांचा आहे.
3) प्रत्येक उप–प्रश्नाचे उत्तर 75 ते 100 शब्दांत लिहा.
4) पहिल्या ओळीमध्ये प्रश्न क्रमांक आणि उप–प्रश्न लिहिल्यानंतर उत्तरे लिहा. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर स्वतंत्र पृष्ठावर लिहावे.

---

1. खालीलपैकी **कोणतेही चार** उपप्रश्न सोडवा.

अ) ॲडम स्मिथच्या अर्थशास्त्राच्या व्याख्येवरील टीका स्पष्ट करा. 5

ब) मागणीच्या लवचीकतेचे कोणतेही पाच सैद्धांतिक आणि व्यावहारिक महत्त्व विशद करा. 5

क) पुरवठ्याच्या लवचीकतेचे प्रकार सविस्तर लिहा. 5

ड) उपयोगिता म्हणजे काय? उपयोगितेची वैशिष्ट्ये लिहा. 5

इ) आऱ्हांसी उत्पत्ती नियम उदाहरणासह स्पष्ट करा. 5

2. खालीलपैकी **कोणतेही चार** उपप्रश्न सोडवा.

अ) समन्वय म्हणजे काय? समन्वयाचे प्रकार सविस्तर लिहा. 5

ब) कृषि व्यवसायाची कोणतीही पाच वैशिष्ट्ये सविस्तर लिहा. 5

क) अनिश्चितता म्हणजे काय? कृषिव्यवसायातील अनिश्चितता कशा प्रकारे कमी करता येईल ते स्पष्ट करा. 5

ड) शेतकऱ्यांना कोणत्या प्रमुख कारणांसाठी वित्तपुरवठ्याची गरज असते ते स्पष्ट करा. 5

इ) अंदाजपत्रक म्हणजे काय? कृषिव्यवसायात अर्थसंकल्पाचे महत्त्व विशद करा. 5

3. खालीलपैकी **कोणतेही चार** उपप्रश्न सोडवा.

अ) शेतीमाल विक्रीव्यवस्थेतील कोणत्याही पाच मध्यस्थांची कार्ये विशद करा. 5

ब) प्रतवारी म्हणजे काय? प्रतवारीचा लाभ मिळविण्यासाठी शेतकऱ्यांनी कोणती पथ्ये पाळावीत ते लिहा. 5

क) कृषि विपणनातील कोणत्याही पाच प्रमुख अडचणी विशद करा. 5

ड) 'शेतकऱ्यास प्रत्यक्ष मिळणारा विक्री–रकमेतील भाग' यावर सविस्तर टिप्पणी लिहा. 5

इ) सहकारी खरेदी–विक्री संस्थांच्या कामकाजात सुधारणा आणण्यासाठी कोणती जबाबदारी घ्यावयास हवी ते लिहा. 5

4. खालीलपैकी **कोणतेही चार** उपप्रश्न सोडवा.

अ) कृषिमालाची निर्यात करताना कोणकोणत्या बाबींचा विचार करावा लागतो, ते सविस्तर लिहा. 5

ब) कृषिमालाच्या निर्यातीमध्ये शीतगृहाचे महत्त्व लिहून शीतगृहात कृषिमालाची साठवणूक कशा पद्धतीने केली जाते ते लिहा. 5

क) जागतिक व्यापारासाठी आयात–निर्यात धोरणे कोणती असतात त्याविषयी लिहा. 5

ड) आंबा निर्यातीमध्ये महाराष्ट्राचे स्थान महत्त्वाचे आहे; कसे ते स्पष्ट करा. 5

इ) फुलांच्या निर्यातीचे अर्थशास्त्र काढताना कोणकोणते खर्च विचारात घ्यावे लागतात ते लिहा. 5